सरकार तर्फे साक्षीदार क्रं. १,

नांव – ज्ञानेश्वर नरसिंग सारोळे,

वय – २८ वर्षे, कामधंदा – रिक्षा चालक,

रा. – निडेबन, उदगीर

साक्षीदार क्र.१ यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री.ए.एस.कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–

दिनांक १९.११.२०१७ रोजी कोणतीही घटना घडली नव्हती. असे काही झाले नाही की, गाडी चालविण्याच्या कारणावरुन सोहेल शेख व माझ्या मध्ये वाद झाला होता.

साक्षीदार क्र.१ यांना फितूर घोषित करुन सरकार तर्फे उलटतपास शपथेवर सुरु ःः–

हे म्हणणे खरे नाही की, दि १९.११.२०१७ रोजी सोहेल शेख व त्यांच्या मित्रांनी दिपक पवारला मारले होते. असे काही झाले नाही की, माझी गाडी क्र. एम.एच १४ बी.डब्ल्यू ९६४२ ही आरोपी यांनी जाळली. हे म्हणणे खरे नाही की, गाडी जाळल्यामुळे माझे पस्तीस हजार रुपयाचे नुकसान झाले होते. माझी व आरोपी यांची कोर्टाबाहेर तडजोड झाली आहे. मला फिर्याद दाखविली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्यावरुन नाही.

**साक्षीदार क्र.१ चा उलटतपास आरोपी क्र.१ ते ५ तर्फे श्री.जे.एस.हाश्मी, विधीज्ञ यांचेव्दारे शपथेवर सुरु ःः–**

मला गाडीचा क्रमांक सागंता येत नाही कारण माझी गाडी नव्हती. मी कुठल्याही आरोपीला ओळखत नाही. केसमध्ये वर्णन केल्याप्रमाणे कोणतेही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.06.09 16:41:17 +0530

दिनांक – ०९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.

उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर.